# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ** आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७ (भारत)
**Board of Sports & Physical Education** Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)
Telephone No. 02025622664, 66 e-mail: directorsports@unipune.ac.in

**Ref. No.** /विक्रीमं/निवडचाचणी/२२९ दिनांक: ०२.०९.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था
पुणे शहर, पुणे जिल्हा, अहिल्यानगर व नाशिक विभाग

विषय: अंतर विभागीय स्पर्धा २०२५–२६.. महाविद्यालयीन खेळाडूंच्या निवड–चाचणीबाबत..
संदर्भ: विद्यापीठ क्रीडा मंडळ नियम पुस्तिका – १९९५ (नियम ३३ पृष्ठ ३९)

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, जर एखादा खेळाडू हा अंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होऊ शकला नाही व तो विभागाच्या संघात निवडला गेला नाही, तर महाविद्यालय अश्या खेळाडूस थेट विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेस निवड चाचणीकरिता पाठवून देते.

याबाबत वरील संदर्भांकित विद्यापीठ क्रीडामंडळ नियम–पुस्तिकेतील उपरोक्त नियम स्वयंस्पष्ट आहे. संबंधितांकडून त्यानुसार कार्यवाही होणे गरजेचे आहे. आपल्या माहितीस्तव विशेष निवड चाचणीबाबत विनंती करीत असताना उपरोक्त नियमावलीतील तरतुद तसेच खालील काही बाबींचे पालन होणे गरजेचे आहे.

अ. अंतर महाविद्यालयीन स्पर्धेदरम्यान निवड चाचणीस पात्र खेळाडू:

१. संबंधित क्रीडाप्रकारातील माजी विद्यापीठ खेळाडू
२. संबंधित क्रीडाप्रकारातील राष्ट्रीय अथवा अंतरराष्ट्रीय खेळाडू
३. महाविद्यालयाचा एखादया क्रीडाप्रकाराचा संघ नाही परंतू संबंधित क्रीडाप्रकारातील काही खेळाडू

**एखादया महाविद्यालयाचा एखादया क्रीडाप्रकाराचा संघ नसेल, व वर नमूद केलेला अ (१ व २) मधील पात्र खेळाडू** हा संबंधित विभागाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेदरम्यान निवड चाचणीस पात्र असेल. जेणेकरून खेळाडूच्या योग्यतेनुसार त्याचा सबंधित विभागाच्या संघात समावेश होऊ शकेल.
**वरील अ (३) मधील** खेळाडूंच्या निवडचाचणीबाबत उपरोक्त विभागीय सचिवांनी आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. निर्णय घेत असताना एखाद्या खेळाडूवर जाणून–बूजन अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ब. विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेदरम्यान विशेष निवड चाचणीस पात्र खेळाडू

१. संबंधित क्रीडाप्रकारातील माजी विद्यापीठ खेळाडू
२. संबंधित क्रीडाप्रकारातील राष्ट्रीय अथवा अंतरराष्ट्रीय खेळाडू

**वरील ब (१ व २) मध्ये** नमूद केलेले खेळाडू हे जर विभागीय अंतर महाविद्यालयीन क्रीडास्पर्धेदरम्यान संबंधित क्रीडाप्रकाराच्या राष्ट्रीय स्पर्धेत (निवड चाचणी, प्रत्यक्ष स्पर्धा, सराव शिबिरे) यांच्या तारखा या अंतर महाविद्यालयीन स्पर्धे दरम्यान येत असतील तरच ते विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेदरम्यान विशेष निवड चाचणीस पात्र असतील. **उपरोक्त अ व ब व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव कोणत्याही खेळाडूस थेट विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेस विशेष निवड चाचणीस पाठवू नये.**

**विभागीय अंतर महाविद्यालयीन स्पर्धेस वरील अ मधील पात्र खेळाडूस निवड चाचणीस पाठविताना** संबंधित महाविद्यालयातील मा. प्रचार्यांचे पत्र व विद्यापीठ क्रीडा पात्रता अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रे इ. व नियमानुसार संघव्यवस्थापक सोबत असणे आवश्यक आहे.

**विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेस विशेष निवड चाचणीस खेळाडू पाठविताना केवळ वरील ब (१ व २)** मधील खेळाडू हे वर नमूद केलेली परिस्थिती ही अंतर महाविद्यालयीन स्पर्धेदरम्यान उद्‌भवल्यास पात्र राहतील. जर वर नमूद केलेला खेळाडू हा संबंधित विभागाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी झाला असेल (संघ नसल्याने निवड चाचणीस अथवा महाविद्यालयाच्या नियमित संघात) व त्याची संबंधित विभागाच्या संघात निवड झालेली नसेल. तर या कारणास्तव तो खेळाडू विद्यापीठ अंतर विभागीय विशेष निवड चाचणीस पाठवू नये असे खेळाडू विशेष निवड चाचणीस पात्र होणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

**विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेस खेळाडूस निवड चाचणीस पाठविण्यापूर्वी नियम पुस्तिका १९९५ नुसार कार्यवाही होणे अत्यंत गरजेचे आहे. जसे की, वरील ब (१ व २) मधील खेळाडू हे अंतर महाविद्यालयीन स्पर्धेदरम्यान उपर उल्लेखित कारणास्तव अनुपस्थित असतील तर विभागीय स्पर्धेदरम्यान विशेष निवड चाचणीस उपस्थित राहत असताना पुढील बाबींची पूर्तता ही विभागीय स्पर्धेपूर्वी होणे आवश्यक आहे.**

१. संबंधित खेळाडूचा अर्ज हा त्याने महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण संचालकामार्फत प्राचार्यांच्या स्वाक्षरीने विभागीय सचिवांना सादर करावा. विभागीय सचिव उपरोक्त खेळाडूच्या कागदपत्रांची शहानिशा करून आपले अभिप्राय व स्वाक्षरी सदर अर्जावर देऊन संबधित अर्ज हा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ कार्यालयास (उचित माध्यमाद्वारे) अंतर विभागीय स्पर्धेपूर्वी पोहोचविण्याबाबत कार्यवाही करतील.
२. विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेच्यावेळेस तसेच स्पर्धेनंतर आलेल्या विशेष निवड चाचणीबाबतच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
३. खेळाडूने जोडलेली कागदपत्रे जसे की, उपरोक्त विद्यापीठ स्पर्धेत गतवर्षी सहभागी झालेल्या प्रमाणपत्राची प्रत अथवा संघात निवड झालेल्या पत्राची प्रत, राष्ट्रीय अथवा अंतर राष्ट्रीय स्पर्धा सहभाग पत्र अथवा प्रमाणपत्र इ. याची शहानिशा झाल्यावरच अश्या खेळाडूस विशेष निवड चाचणीस अनुमती देण्यात येईल.
४. विशेष निवड चाचणीस येणा—या खेळाडूसोबत संबंधित महाविद्यालयाचा स्वतंत्र संघव्यवस्थापक व स्पर्धा संयोजन शुल्क नियमानुसार जमा करणे आवश्यक आहे.
५. **अपवादात्मक परिस्थितीत** जर एखादा वरील ब (१ व २) मधील उल्लेखित पात्र खेळाडू हा विशेष निवड चाचणीस अर्ज देऊनही केवळ राष्ट्रीय अथवा अंतर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा कार्यक्रमामुळे अनुपस्थित राहील्यास अश्या खेळाडूबाबत संबंधित खेळाचे निवड समिती सदस्य, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ हे निर्णय घेतील.

सबब निवड चाचणी तसेच विशेष निवडचाचणीबाबत आवश्यकता भासल्यास वरीलप्रमाणे कार्यवाही ही विहित मुदतीत करून सहकार्य करावे.

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. सुदाम शेळके)
सहायक क्रीडा संचालक (अतिरिक्त कार्यभार)

प्रत माहितीकरिता: १. सर्व विभागीय क्रीडा समिती सचिव
२. शारीरिक शिक्षण संचालक, संबंधित महाविद्यालय